POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र


○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२५१ ● मुंबई, मंगळवार, १४ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त बीएमसी सज्ज
## अनुयायांसाठी विविध प्रकारच्या नागरी सेवा-सुविधा



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या वतीने दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी स्मारक, 'राजगृह' निवासस्थान आणि संबंधित परिसरांमध्ये विविध प्रकारच्या नागरी सेवा-सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी स्मारक येथे माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी अन्य मान्यवर हे मंगळवारी (14 एप्रिल) सकाळी 9.30 वाजता पुष्प अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतील.

### मुंबई महापालिका

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दादरस्थित चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करण्यासाठी दरवर्षी अनुयायी येतात. त्यामुळे या अनुयायींसाठी विविध प्रकारच्या नागरी सोयी-सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या निदेर्शानुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे. उपआयुक्त (परिमंडळ 2) प्रशांत सपकाळे, जी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त विनायक विसपुते यांच्या देखरेखीखाली विविध स्तरीय कार्यवाही करण्यात आली आहे.

चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक तसेच परिसरामध्ये नियंत्रण कक्ष, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, शौचालये आदी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यासोबतच सीसीटीव्ही, चैत्यभूमीजवळ समुद्रात जीवरक्षक बोटी, अग्निशमन दलाचे पथक तैनात करण्यासह अग्निशमन सुविधा सुसज्ज ठेवण्यात आल्या आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेतील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी पुरेशा संख्येने नेमण्यात आलेले आहेत. अणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ मदतीसाठी रुग्णवाहिकाही तैनात करण्यात आली आहे.

### डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचेही आयोजन

14 एप्रिल रोजी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागाद्वारे करण्यात आले आहे. या प्रदर्शन दालनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी जीवन प्रवासातील दुर्मिळ छायाचित्रे असणार आहेत. त्याचबरोबर या प्रदर्शन दालनात, संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरक जीवनचरित्रावर आधारित कॉफी टेबल बुक देखील विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे.

### जयंती कार्यक्रमाचे समाजमाध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण

दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमाचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या यूट्युब या समाज माध्यम खात्यावरुन थेट प्रक्षेपण केले जाईल. तसेच, फेसबुक, एक्स (पूवीर्चे ट्विटर) या माध्यमांवरून देखील सहक्षेपण करण्यात येईल.



## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत धडाकेबाज 7 निर्णय!

राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या बैठकीत एकूण सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांनुसार आता शासन सेवेतील पदभरती प्रक्रियेत सुधारणा केली जाणार आहे. सोबतच मुंबईत यईएस स्किल टेक विद्यापीठ स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

- **सामान्य प्रशासन विभाग :** शासन सेवेतील पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करणार. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला अनुसरून कृती आराखडा. एमपीएससीच्या माध्यमातून घेणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या ५३ वरून १५३. संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने काही सेवांचा समावेश होणार. भरती प्रक्रीया सुलभ होणार. युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबविणार.
- **नगरविकास विभाग :** कुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील स्टेडीयमच्या आरक्षणात बदल करून वीज उपकेंद्राकरिता जमीन देणार. चार एकर जमीन टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरीत करण्याचा निर्णय.
- **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग :** मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठ होणार. विद्यापीठ स्थापनेस मंजुरी. कायम स्वयंअर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेमुळे कुशल मनुष्यबळ विकासाला चालना मिळणार
- **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग :** नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणार. त्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी.
- **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :** राज्यातील वैद्यकीय शिक्षण प्रणाली, नर्सिंग सेवा आणि आरोग्य सेवा वितरण यंत्रणा अधिक सक्षम होणार. सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्य उपलब्ध होणार.
- **नियोजन विभाग :** नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या आणखी सहा जिल्हयांचा समावेश. त्यामुळे सध्याच्या २७ आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५० अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये संतुलित, सर्वांगिण व गतिमान विकासाच्या योजना राबविणार.
- **वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :** वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करणार. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार प्रशासन व संस्थात्मक रचनेत बदल होणार. परिषदेमधील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीच्या ऐवजी शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीने होणार.

## माय भारत बजेट क्वेस्ट 2026 : मुंबई विभागाचा भव्य समारोप यशस्वीरित्या संपन्न



■भाईंदर। प्रतिनिधी,

माय भारत प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे आयोजित माय भारत बजेट क्वेस्ट 2026 (मुंबई विभाग) चा भव्य समारोप डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे यशस्वीरित्या पार पडला. 12 ते 13 एप्रिल 2026 या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्र, गोवा आणि पुडुचेरी येथील युवक-युवतींनी सहभाग घेतला. या कार्यक्रमातून सहभागी शासन आणि युवकांच्या धोरणात्मक संवादाची सशक्त भावना प्रकषार्ने दिसून आली.

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भावपूर्ण वातावरणात झाली. महान गायिका आशा भोसले यांच्या आकस्मिक निधनाबद्दल उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली तसेच त्यांच्या भारतीय संगीत आणि संस्कृतीतील अमूल्य योगदानाबद्दल आदर व्यक्त करत दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

यानंतर स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून युवकांना राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरणा देण्यात आली. त्यानंतर अमित पुंडे, राज्य संचालक, माय भारत महाराष्ट्र व गोवा यांनी माय भारत संदर्भात मार्गदर्शनपर सत्र घेतले.

कार्यक्रमातील एक प्रमुख आकर्षण म्हणजे केंद्रीय अर्थसंकल्प 2026 मधील 'विकसित कृषी' आणि 'मानवी भांडवल विकास' या महत्त्वपूर्ण विषयांवर आयोजित तज्ञ पॅनेल चर्चा होय. या चर्चेत सचिन जाधव, अक्षय खोरगडे, गौरव गुप्ता, अमित गुप्ता, राजलक्ष्मी पाटील आणि विनय कुमार अवारे यांनी सहभाग घेतला. या सत्राचे प्रभावी संचालन संकेत कलांबे यांनी केले. युवकांनी उत्साहाने सहभाग घेत संवाद साधला.

याशिवाय, मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे यांनी युवकांना मार्गदर्शन करत त्यांना राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घेण्यास प्रेरित केले. त्यांनी सार्वजनिक धोरणांमध्ये सजग आणि माहितीपूर्ण सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमात केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्री, भारत सरकार माननीय मनसुख मांडवीया यांचे आभासी मार्गदर्शन लाभले. त्यांनी देशाच्या विकासप्रक्रियेत युवकांच्या सक्रिय भूमिकेचे कौतुक केले. तसेच माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'पंचप्राण' संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करत युवकांनी विकसित भारत @2047 या ध्येयपूर्तीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

या उपक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित करत माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संदेशाद्वारे या कार्यक्रमातील व्यापक सहभाग आणि रचनात्मक संवादाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की अशा प्रकारचे मंच युवकांना धोरणनिर्मितीत सक्रिय योगदान देण्यास सक्षम करतात आणि भारताच्या विकासाच्या प्रवासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तसेच सहभागी शासनव्यवस्थेला बळकटी देतात. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या प्रेरणादायी संदेशाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या दोन दिवसीय कार्यक्रमांतर्गत "नारी शक्ती : विकसित भारत की आवाज – समावेशक लोकशाही सशक्तीकरण" या विषयावर नारी शक्ती युवा संसद आयोजित करण्यात आली. यात 350 पेक्षा अधिक युवतींनी संसदीय पद्धतीने चर्चा करून विधिमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढविण्याच्या समर्थनार्थ ठराव मंजूर केला. या कार्यक्रमाला सुजाता पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच "संडेज ऑन सायकल" या रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या रॅलीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. बी. डी. सोमाणी इंटरनॅशनल स्कूल ते सिडको फुटबॉल स्टेडियम या मार्गावर 350 हून अधिक युवकांनी सहभाग घेत पर्यावरण जागरूकता, तंदुरुस्ती आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश दिला.

एकूणच, माय भारत बजेट क्वेस्ट 2026 च्या अंतिम फेरीत 750 निवडक युवकांनी सहभाग घेतला. त्यांनी तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांशी सक्रिय संवाद साधत विकसित भारत @2047 या संकल्पनेला बळकटी दिली आणि राष्ट्रनिर्मितीबाबतची आपली ऊर्जा, कल्पकता आणि बांधिलकी प्रदर्शित केली.

## ८ व्या राष्ट्रीय पोषण पंधरवड्याचा शुभारंभ
### बालकांच्या बौद्धिक विकासावर असणार विशेष भर

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

बालकांच्या आयुष्यातील पहिल्या सहा वर्षांतील मेंदूचा विकास आणि सर्वांगीण आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने दि.९ ते २३ एप्रिल २०२६ या कालावधीत ८ वा राष्ट्रीय पोषण पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

केंद्र सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्यातही हा उपक्रम जिल्हा, प्रकल्प आणि अंगणवाडी स्तरावर मोठ्या उत्साहात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट बालकांचा बौद्धिक विकास सुनिश्चित करण्यासाठी पालक, कुटुंबीय आणि समुदायामध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे हे आहे.

यावेळच्या पोषण पंधरवड्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या मुख्य संकल्पनांमध्ये माता व बालकांचे पोषण, ३ वर्षांपर्यंतच्या बालकांसाठी मेंदू विकासाकरिता पूर्व उद्दीपन आणि ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी खेळ आधारित पूर्व शालेय शिक्षण या विषयांना प्राधान्य देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, वाढत्या तंत्रज्ञानाच्या युगात मुलांचा 'स्क्रीन टाइम' कमी करण्यासाठी पालक आणि समुदायाची भूमिका स्पष्ट करण्यावरही यात भर दिला जाणार आहे. तसेच अंगणवाडी केंद्रांचे सक्षमीकरण करण्यासाठी स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

या राष्ट्रीय महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा ९ एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे संपन्न झाला आहे. यावेळी 'पोषण ट्रॅकर' ॲपवरील होम शेड्यूलरचे लोकार्पण आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राज्यांच्या यशोगाथांचे सादरीकरण करण्यात आले. राज्यातील सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका आणि अंगणवाडी सेविका या उद्घाटन सोहळ्याला वेबकास्टच्या माध्यमातून उपस्थित होत्या.

## कल्याण-आहिल्यानगर महामार्ग एका घोडचुकीमुळे 11 जणांचा जागीच मृत्यू
## एकाच कुटुंबातील 3 मुलीही दगावल्या... मयत व्यक्तींची नावे आली समोर

एवढ्या मोठ्या प्रमाणात या मार्गावर अपघात होण्यासाठी चार ते पाच महत्त्वाची कारण आहेत. ज्यात प्रमुख्याने या मार्गावरुन जाणारे भाजीपाल्याचे पिकअप, ट्रक, बस हे आहे. तसेच या मार्गावरील रस्ता काही भागामध्ये अरुंद आणि अत्यंत वळणार आहे. काही ठिकाणी नदीवर पूल बांधले जात असल्याने रखत रखडत वाहतूक होत असते. वेग आणि नियमांचा भंग करुन अनेकजण वाहनं चालवतात. अनेक वहानं ओव्हरस्पीडींग करतात. या ठिकाणी तासाला 80 किमी प्रती तास वेगमयार्दा आहे. ओव्हरलोडींग आणि बेकायदेशीरपणे या मार्गावरुन अनेक चालक गाड्या चालवतात. पावसाळ्याच्या दिवसात येथील रस्ता फारच धोकादायक ठरतो कारण या ठिकाणी पथदिवे नाहीत. महामार्ग चौपदरीकरण पुलाच्या कामामुळे अनेक ठिकाणी डायव्हर्जन करण्यात आलं आहे.





**मृतांची नावे**
- प्रशांत चेदणे
- भूषण घोरपडे
- अनंता पवार
- दीपक गवळी
- नेहा मोहपे
- मानसी मोहपे
- प्रथमेश मोहपे
- जिजागा केमबारी
- गणपती मदे

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून अपघाताबाबत संवेदनशील निवेदन जारी

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या अपघाताबाबत निवेदन जारी करत म्हटले की, आज दिनांक 13 एप्रिल 2026 रोजी सकाळी सुमारे 10:45 वाजण्याच्या सुमारास कल्याणझमुरबाडझमाळशेज महामार्गावर रायते गावाच्या हद्दीत, पांजरपोळ गोशाळेजवळील उल्हास नदीवरील नव्या पुलावर अत्यंत दुर्दैवी अपघात घडला. कल्याणकडून प्रवासी घेऊन येणारी ओम्नी कार (क्र. एमएच-05 जीए-0529) आणि अशोक लेलँड कंपनीचा मिक्सर (क्र. एमएच-12 टीवी-3660) यांची समोरासमोर धडक होऊन हा भीषण अपघात झाला. या अपघातात ओम्नी कारमधील 11 निरपराध प्रवाशांचा मृत्यू झाल्याची अतिशय वेदनादायी बातमी समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून, मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित वाहनाची अधिकृत क्षमता 5+1 असताना त्यामध्ये 11 प्रवासी प्रवास करत होते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. राज्याचा मोटार परिवहन विभाग अवैध प्रवासी वाहतुकीविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई करत आहे. मात्र, अशा दुर्घटना टाळण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारीने वागणे अत्यावश्यक आहे. अवैध व क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणाऱ्या वाहनांमधून प्रवास करणे टाळावे, तसेच सुरक्षित आणि नियमबद्ध प्रवासाला प्राधान्य द्यावे, ही नम्र विनंती

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. आज सकाळी सुमारे 11 वाजण्याच्या सुमारास रायते येथील नवीन ब्रिजवर मुरबाडहून कल्याणकडे जाणारी ओम्नी प्रवासी गाडी आणि मिक्सर यांच्यात जोरदार टक्कर झाली. या दुर्घटनेत 11 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत आणि जखमींपैकी अनेकजण मुरबाड परिसरातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातातील मृतांची नावे आता समोर आली आहेत.

आज सकाळी झालेल्या अपघाताची माहिती मिळताच कल्याण तालुका पोलीस आणि टिटवाळा पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि मदतकार्य सुरू केले. ओव्हरटेक करताना हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघातात 11 जणांचा मृत्यू झाला असून यात एकाच कुटुंबातील तीन मुलींचाही मृत्यू झाला आहे. तसेच महसूल विभागातील कर्मचारी देखील दुर्घटनेत ठार झाल्याचे समोर आले आहे. चालकाच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना झाल्याची माहिती आमदार किसन कथोरे यांनी केले आहे.

### स्थानिक नागरिक आक्रमक

दरम्यान, या अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. पूल पूर्णपणे सुरक्षित नसतानाही घाईघाईत सुरू करण्यात आल्यामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. तसेच, अपघातग्रस्त ओम्नी टॅक्सीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याची माहिती समोर आली आहे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याचे समोर आले आहे. सध्या या अपघातातील जखमींवर उपचार सुरू आहेत.

## नाशिक आयटी कंपनीत तरुणींना धर्मांतर करण्यामागे महिलाच मास्टरमाइंड
## पर्दाफाश होण्यापूर्वीच मुंबईत करून घेतली बदली

### कोण आहे महिला मास्टरमाइंड?

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या महिला मास्टरमाइंडचं नाव निदा खान असं आहे. तिच्यावर गुन्हा नोंद होण्यापूर्वीच तिने नाशिकमधून पलायन केलं होतं. ती मूळची नाशिकचीच आहे. मिळालेल्या माहितीनुसार तिने काहीच महिन्यांपूर्वी नाशिक कंपनीतून मुंबईत बदली करुन घेतली. पोलिसांनी निदा खान अटक केली. निदा खानसह पोलिसांनी दानिश शेख, तौसिफ अत्तारला अटक केली आहे. आरोपींनी नोकरीसाठी भरलेल्या इंटरव्ह्यू फॉर्ममधील वैयक्तिक माहितीचा गैरवापर करून महिलांना जाळ्यात ओढल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींनी पदोन्नती आणि पगारवाढीचे आमिष दाखवून, तसंच काही प्रकरणांत ब्लॅकमेल करून महिलांचे शोषण केलं. तपासादरम्यान धर्मांतराचा प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावल्याचे आरोपही समोर येत असून, एसआयटी त्या दिशेने कसून चौकशी करत आहे.




■मुंबई। प्रतिनिधी,

नाशिकच्या प्रसिद्ध आयटी कंपनीमधील धर्मांतराचं प्रकरणात दररोज मोठे खुलासे होत आहेत. तपासामध्ये अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे की, कंपनीतील अत्याचार, विनयभंग आणि धर्मांतराच्या प्रयत्न केल्याच्या प्रकरणात एक महिला मास्टरमाइंड आहे. तरदुसरीकडे या प्रकरणात अटकेत असलेल्या संशयित कर्मचाऱ्याला कंपनीतून तूर्त निलंबित करण्यात आलं आहे. या प्रकरणातही एसआयटी तपास कर असून त्यांच्याकडून कंपनीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. तसंच संशयीत आरोपींची बॅक हिस्ट्री जमा केली जाते आहे. त्यापूर्वी या प्रकरणात या नव्या खुलासामुळे तपासाला वेग आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुप्त माहितीच्या आधारे मार्च 2026 मध्ये पहिला एफआयआर दाखल झाली. त्यात नंतर अनेक तक्रारी समोर आल्यात. छळ, जबरदस्ती आणि तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप . पीडितांनी केला आहे. अनेक महिला कर्मचारी आणि किमान एका पुरुष सहकाऱ्याने वरिष्ठ कर्मचाऱ्यांच्या, विशेषतः टीम लीड्सच्या एका गटाकडून सतत होणाऱ्या छळाचा आरोप केल्या आहेत.

दरम्यान तक्रारदारांनी वारंवार अयोग्य स्पर्श, अश्लील टिप्पणी, विनयभंग आणि काही प्रकरणांमध्ये, लग्नाच्या खोट्या आश्वासनांखाली शारीरिक संपर्क साधल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. पीडितांनी इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी, प्रार्थना करण्यासाठी आणि मुस्लिम धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याचाही या तक्रारीमध्ये उल्लेख आहे. काहींनी तर त्यांना धर्मांतर करण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न झाल्याचाही आरोप या तक्रारीतून केला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# एक होती आशा...



**'मेलडी क्वीन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या गायिका आणि विख्यात मंगेशकर कुटुंबातील कनिष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने चित्रपट संगीताचा श्वास थांबला.**

मंगेशकर भगिनींचा जन्म सांगलीचा. दीनानाथ मंगेशकर हे त्यांचे वडील. त्यांच्या पश्चात लतादीदींनी संगीत क्षेत्रात पाऊल टाकले. त्यानंतर आशा ताईंचे हिंदी चित्रपट संगीतसृष्टीत आगमन झालं. लता दीदी म्हणजे हिंदी चित्रपट संगीतसृष्टीला पडलेलं सोनेरी स्वप्न होतं तर आशाताई म्हणजे त्याच चित्रपट संगीतसृष्टीला पडलेलं रूपेरी स्वप्न. आशाताईंनी १२ हजार गाणी गायिली. जवळजवळ प्रत्येक गीत हिट या गणतीत जाणारे होते. लता दीदी असोत की आशाताई या दोघींनी जीवनाची प्रदीर्घ वर्षे चित्रपट संगीतसृष्टीत सर्वोच्च स्थान पटकावले. आशा ताईंचा आवाज चिरकाल टिकणारा होता. लता दीदींनी उडत्या चालीची गाणी फार गायिली नाहीत. पण आशाताई उडत्या चालीच्य गाण्यांसाठी, कॅबरे आणि नृत्यगीतांसाठीच प्रसिद्ध होत्या. त्यांनी गीतातील शब्दांशी कधी तडजोड केली नाही. जेव्हा शब्द त्यांना खटकत तेव्हा त्यांनी ते गीतकाराकडून बदलून घेतले. याबाबतीत गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी आशाताईंसाठी लिहीलेले 'पिया तू अब तो आजा' हे गाणे उदाहरणादाखल द्यावं लागेल. यातील शब्द आशाताईंना खटकले तेव्हा मजरूहजींना सांगून त्यांनी ते बदलून घेतलं. तरीही ते गाणे आज आशाताईंच्या गाण्यातील सर्वात गाजलेले गाणे म्हणून गणले जाते. या गीताला त्यावेळी आकाशवाणीवर काही दिवस बंदी होती. आशा ताईंनी दोन विवाह केले. गणपतराव भोसले हे त्यांचे पहिले पती, तर संगीतकार आर. डी.बर्मन हे दुसरे. त्यापैकी गणपतराव भोसले यांच्याशी विवाह केल्यावर काही काळातच त्यांचा घटस्फोट झाला. पण संगीतकार आरडी बर्मन यांच्याशी त्यांचे संगीत आणि जीवनाचे घट्ट सूर जुळले होते. बर्मन आणि आशाताईंनी अनेक ब्लॉकबस्टर गाणी दिली आणि त्यापैकी अनेक गाणी आजही लोकांच्या ओठांवर आहे. त्यांचं चकाकणारं स्टारडम सगळ्यांनी पाहिलं. मात्र त्यांच्या वेदना कुणालाच दिसल्या नाही. त्यांचं आयुष्य केवळ प्रसिद्धी आणि सुरांनीच सजलेलं नव्हतं, तर त्यामागे वेदना आणि संघषार्चा एक मोठा काळ होता. आशा भोसले यांनी त्यांच्या जीवनावर आधारित बायोग्राफीमध्ये पहिल्या लग्नात झालेला छळ आणि त्यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रयत्नाबाबत अत्यंत धक्कादायक खुलासे केले आहेत. त्यांना एकूण तीन मुलं होती. यात एक मुलगी आणि दोन मुलांचा समावेश होता. दुदैर्वाने, नियतीने त्यांच्यावर अनेक आघात केले. त्यांची मुलगी वर्षा, जी पत्रकार होती, तिने आत्महत्या केली. तर मुलगा हेमंत भोसले यांचे कॅन्सरसारख्या आजाराने निधन झाले. इतकं दुःख पचवून आशाताई पुन्हा उभ्या राहिल्या. आशा भोसले यांचा संगीतकार ओ. पी. नय्यर आणि आर. डी. बर्मन यांच्याशी असलेला सांगीतिक प्रवास भारतीय चित्रपटसृष्टीतील सुवर्णपान आहे. नय्यर साहेबांनी आशाताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखून अनेक सुपरहिट गाणी दिली. त्यांनी १२ हजारांहून अधिक गाणी गायली असून, सर्वाधिक गाण्यांचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.आशा भोसले यांनी 'उमराव जान' सारख्या चित्रपटातील भावपूर्ण गझलांना आवाज देण्यासोबतच, हिंदी चित्रपटसृष्टीत अनेक आयकॉनिक कॅबरे आणि डान्स नंबर्स (उदा. 'दम मारो दम', 'पिंजरावाली आया') गायली. त्यांच्या आवाजातील अष्टपैलुत्वामुळे हे कॅबरे गाणे त्यांच्या ओळखीचा एक मोठा भाग बनले, ज्यामुळे त्यांना 'कॅबरे क्वीन' म्हणूनही ओळखले जाऊ लागले. आशा ताई यांचे घर संगीताच्या वातावरणाने ओतप्रोत भरलेले होते. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे एक अत्यंत प्रसिद्ध मराठी नाट्यसंगीतकार, शास्त्रीय गायक आणि अभिनेते होते. दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून मिळालेल्या शास्त्रीय संगीताच्या प्रेरणेने त्यांनी आपले गायन कौशल्य विकसित केले. त्यांनी आठ दशकांहून अधिक काळ गायन केले. हिंदी आणि मराठीसह अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहे. त्यांना पद्मविभूषण, दादासाहेब फाळके आणि अनेक फिल्मफेअर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले."पिंजरा," "दम मारो दम," "ये मेरा दिल" आणि इतर अनेक प्रसिद्ध गाण्यांनी त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केले. त्यांनी वडिलांचे शास्त्रीय संगीत गाण्याचा वारसा पुढे चालू ठेवला आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. आशा भोसले आणि लता मंगेशकर यांच्यातील संबंधांबद्दल अनेक वर्षे चर्चा आणि तर्कवितर्क लढवले गेले. मनोरंजन विश्वात अशा चर्चा होत्या की दोन दिग्गज गायिका एकाच घरात असल्याने त्यांच्यात व्यावसायिक असूया असू शकते. लता मंगेशकर यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला होता. त्यांनी स्पष्ट केले होते की, त्यांच्यात कोणतीही कटुता नाही आणि आशा भोसले या त्यांच्या धाकट्या बहिण आहेत. त्यांचे आपापसात उत्तम संबंध आहेत. त्यानंतर कुणीही ती चर्चा करण्याची हिमत केली नाही. आशाताई लतादीदींना गुरूस्थानी मानत. आशाताई आणि लता दीदी या भारतीय चित्रपट सृष्टीतील दोन सर्वात दिग्गज गायिका. हे नाते केवळ व्यावसायिक स्पर्धा नव्हते, तर ते बहिणींमधील एक भावनिक नाते होते. चित्रपट सृष्टीतील काही लोकांनी त्यांच्यात गैरसमज पसरवून दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, हे आशा ताईंनी एका मुलाखतीत कबूल केले होते. लोक अनेकदा चुकीच्या गोष्टी सांगून तणाव निर्माण करत, पण "रक्त हे पाण्यापेक्षा जास्त गडद असते" असे सांगून आशा ताई यांनी या बातम्या फेटाळून लावल्या होत्या.अनेक दशकांचा प्रवास, व्यावसायिक स्पर्धा आणि वैयक्तिक आयुष्यातील वादळानंतरही, त्यांचे नाते अखेरपर्यंत टिकून राहिले. आशा ताईंनी गायलेल्या गाण्यांमधील चालींमध्ये एक प्रकारची नजाकत होती. या चालींना आशाताईंच्या सोनेरी आवाजाचा परिस स्पर्श होता. आशा ताई यांनी संगीताच्या क्षेत्रात अष्टपैलुत्व गाजवले आहे. गझलांपासून ते पॉप संगीतापर्यंत आणि भावपूर्ण गीतांपासून ते भजनापर्यंत अनेक प्रकार हाताळले. २०११ मध्ये दिग्गज गायिका आशा भोसले यांची 'सर्वाधिक रेकॉर्डेड गायिका' म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद करण्यात आली.११,००० हून अधिक एकल, युगल आणि कोरस गाणी रेकॉर्ड केल्याबद्दल त्यांना हा बहुमान लंडनमध्ये देण्यात आला होता. आशा ताईंची नोदं "क्वीन ऑफ इंडी पॉप" आणि "टाईमलेस आवाजाच्या मलिका" अशी केली जाईल. आशाताईंना विनम्र अभिवादन!

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विकसित भारतासाठी जलनियोजन



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध या या दोघांनाही पाण्याच्या अधिकारासाठी संघर्ष करावा लागला. रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून शाक्य आणि कोलियांच्या रक्तरंजित युद्धाला सिद्धार्थ गौतमाने रोखून धरले. ही तत्कालीन सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. तर बाबासाहेबांच्या संघर्षाची सुरुवात चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून होते. पाणी हे सार्वकालिक जीवन असल्याने त्याचे महत्व या दोघांनाही होते. बुद्ध आणि बाबासाहेब या दोघांच्या जीवनाला पुढे क्रांती आणि उजेर्चा प्रवाह देण्यात 'पाणी' हा घटक समान होता.

भारताच्या जलनियोजन नीतीमध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान मोलाचे आहे. जल व्यवस्थापन आणि धोरणाविषयी बाबासाहेब कमालीचे सजग आणि आग्रही होतेच. सामाजिक आणि आर्थिक सुधारणांचा पाया पाण्याचे योग्य वाटप वितरण, जलसंधारण, सिंचन असल्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. शेती, विकास, उद्योग, जीवन, आरोग्यासाठी पाणी अत्यंत प्राथमिक गरज असल्याने त्याविषयी बाबासाहेबांना कमालीचे गंभीर होते. कृषीप्रधान भारतात पाण्याची उपलब्धता इथल्या जगण्यासाठी महत्वाची आहे. प्रत्येक थेंबाचा योग्य सदुपयोग व्हायला हवा, म्हणून त्यांनी शेतकरी आणि शेतीविकासात पाण्याच्या नियोजनाला महत्व दिले. कालवे, धरणांची उभारणी, सिंचन प्रकल्पांवर बाबासाहेबांनी जोर दिला. शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि इतर बहुतेक समस्यांचे उत्तर पाण्याच्या नियोजनात असल्याचे त्यांनी ओळखले होते. पाण्याचे वाटप हे सामाजिक न्यायाच्या सिद्धांतानुसार व्हायला हवे, असा त्यांचा आग्रह होताच.

भारतीय समाज व्यवस्थेत उच्चवर्णीय आणि श्रीमंत शेतकरी, जमिनदारांकडून पाण्याचा मोठा वाटा हिरावला जात होता. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांची पिके पाण्यावाचून जळून जात होती, त्यांच्या शेतीला पाणी मिळत नसल्याने गरीब अल्पभूधारक शेतकऱ्याची स्थिती दयनीय होती. शोषित, पीडितांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाण्याला स्पर्श करण्याचा अधिकारही नसल्याने शेती, जेवण तसेच इतर गरजांसाठी पाणी मिळवण्याचा प्रश्न त्यांच्यासाठी खूप पुढचा होता.

केवळ पिण्याचे किरकोळ पाणी मिळावे म्हणून कायदा करण्याची येथील गरज ही इथला माणूस, हा माणूसपणापासून किती दूर होता, याचे वाईट उदाहरण ठरावे. बाबासाहेबांनी पाणी वाटपात कायदा आणि प्रशासकीय धोरणाची गरज मांडली. डॉ. आंबेडकर जल, वीज, सिंचन मंत्रीपदी असताना त्यांनी जलनियोजनात केलेली धोरणात्मक कामे आजही पाणीवितरणाच्या मुद्यावर मार्गदर्शक ठरणारी आहेत. बाबासाहेबांनी महाराष्ट्रातील मूल नदी खोरे प्रकल्पाची संकल्पना मांडली. हा प्रकल्प शेती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी करण्यासाठी होता, या प्रकल्पातून महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांसाठी पाणीपुरवठ्याच्या अनेक योजनांची आखणी केली गेली होती, जी आजही मार्गदर्शक ठरत आली आहे. निसर्ग जीवनातील सर्व जीवांसाठी पाण्याचे महत्व किती आहे, हे पाण्यासाठी संघर्ष केलेल्या बाबासाहेबांइतके कोण जाणू शकत होते? परंतु बाबासाहेब कायद्याचे, आर्थिक, मानववंशशास्त्र आणि सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक होते. जल अभियांत्रिकी, बांधकाम अभियांत्रिकी हे त्यांच्या अभ्यासाचे विषय नसल्यामुळे धरण, इमारत बांधणी, वीज निर्मिती क्षेत्रात काम करणाया देशातल्या नावाजलेल्या अभियंत्यांची त्यांनी भेट घेतली. जगातील नावाजलेल्या लायब्ररीतून त्या त्या विषयाचे अभ्यास, संदर्भ ग्रंथ मागावून अभ्यासले, या क्षेत्रातील अभियांत्रिकी संकल्पना बाबासाहेबांनी समजून घेतल्या, जगभरातल्या नावाजलेल्या विद्यापीठातील ग्रंथालयांशी त्यांचे नाते होतेच, ही ओळख अशी कामी आली. पाण्याचा प्रश्न हा एकाच वेळी, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक तसेच येथील पायाभूत विकास आणि उर्जा, तंत्रज्ञानावरही परिणाम करणारा असल्याचे त्यांना माहीत होते. सामाजिक न्याय आणि पायाभूत विकासात वीज आणि पाणी या दोन घटकांचे महत्व त्यांनी ओळखले होते.

वीज, पाणी आणि कामगार, शेतकरी हे सर्वच घटक त्यांच्या मंत्रीपदाच्या काळात तसेच्या त्यांच्या खात्यांशी, चळवळीशी संबंधित असल्याने बाबासाहेबांना याविषयी कमालीची आत्मियता होती. पाण्याचे समान वाटप होताना शेतकरी कामगारांच्या सहकारी चळवळीला त्यांनी बळ दिले. जलनीती हे सामाजिक परिवर्तनाचे साधन असल्याचा विश्वास डॉ. आंबेडकरांना होता. सध्या चर्चिल्या जात असलेल्या राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाची कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ ते १९४५ दरम्यान मांडली आणि संविधानात त्यासाठी तरतूदही केली. जलसंपत्तीचा प्रवाह असलेल्या भारतातल्या नद्यांची नैसर्गिक जपवणूक आणि स्वच्छता महत्वाची असून कुठल्याही विकासासाठी नद्यांचा बळी दिला जाऊ नये, असा त्यांचा विचार होता. वारंवार येणाऱ्या अतीवृष्टी आणि पुरामुळे गावे, शहरांचेही नुकसान होत असताना महापुराच्या अतिरिक्त पाण्याचा विनियोग करण्यावर त्यांनी भर दिला. देशातील दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुंड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी बाबासाहेबांचे योगदान मोलाचे आहे. जगातील नैसर्गिक जलस्त्रोत विकासाच्या नावाखाली आटवले, संकुचित केले जात असताना जगात जर तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्याच्या मागणीसाठी होईल, हे त्यांनी त्यावेळीच जाणले असावे. वर्ष १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांनी कामगार मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्याकडे श्रम, सिंचन आणि वीज ही पायाभूत विकासातील महत्वाची खाती सोपवण्यात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगात सिंचन, वीज आणि आर्थिक विकासाचे वारे वाहू लागले होते. यावर दूरगामी धोरण ठरवण्याचे काम बाबासाहेबांकडे आले.

श्रम, सिंचन, वीज प्रकल्पांसाठी दोन राज्यात वाहर्णाया नद्यांच्या पाण्याचे वाटप त्यातून निर्माण होणारी वीज आणि आर्थिक सुबत्ता याचे योग्य प्रमाणात वाटप, जलविद्युत प्रकल्पांतून होर्णाया उर्जा आणि विकासाच्या लाभांची वाटणी ठरवण्याच्या अधिकाराचा त्यात समावेश होता. सोबतच राष्ट्रीय सिंचन धोरण ठरवण्यातही बाबासाहेबांचे योगदान होतेच. राज्यघटना निर्मितीच्या कामात डॉ. आंबेडकरांनी 'पाणी' या विषयाशी संबंधित असलेल्या सर्वच खाती, घटकांना केंद्राच्या अखत्यारित असण्याचा आग्रह केला. परिणामी 'पाणी' या विषय राज्यघटनेच्या क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत होऊन केंद्राला याविषयी कायदे करण्याचे अधिकार मिळाले. नदी आणि धरणांच्या पाणीवाटपावरून राज्या-राज्यांमध्ये असलेली भांडणे सोडवण्यासाठी याच तरतुदीतून आंतरराज्यीय जलविवाद कायदा, नदीखोरे प्राधिकरण कायदा १९५६ मंजूर करण्यात आला. पुराचे पाणी म्हणजे 'संकट' ही संकल्पना बाबासाहेबांना 'संधी' अशी बदलून घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत मोलाचे मार्गदर्शन केले, अतिवृष्टीचे क्षेत्र अभ्यासून आणि जलनियोजनाच्या बांधणीतून पुराच्या पाण्याचा विनियोग करता येईल, या संकटाच्या पाण्याला ऊर्जा आणि विकासाच्या संधीत बदलण्याविषयी त्यांनी विचार मांडले. भारतात पाण्याच्या टंचाईमुळे शेतकरी कामगार आणि गोरगरीबांना ज्या प्रमाणात कष्ट सोसावे लागतात, त्या तुलनेत पाण्याच्या उपलब्धतेमुळे तेवढे कष्ट पडत नाहीत, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आजही, 'ओला दुष्काळ परवडला पण, कोरडा दुष्काळ नको' अशीच मांडणी शेतकऱ्यांकडून केली जाते. भारताच्या भौगोलिक रचनेमुळे पर्जन्यमानासारखे नाही. नदी जोड किंवा शाश्वत जलधोरणाच्या उभारणीतून थेंब-थेंब पाण्याचा योग्य ठिकाणी गरजेनुसार विनियोग झाल्यास सर्वच घटकांच्या विकासासाठी समान संधी उपलब्ध होईल, असा त्यांचा विश्वास होता. धरणे, बंधारे, कालव्यातून पाणी अडवून जिरवून शेती, अल्पभूधारकांच्या पशूधनासाठी या पाण्याचा उपयोग होईल, पुरातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी बंधारे, धरणे गरजेची आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी महानदीवरील बहुद्देशीय विकास प्रस्तावावर डॉ. आंबेडकरांशी चर्चा करुन हिराकुंड धरण प्रकल्पाची अंमलबजावणी केली होती. या शिवाय बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली 'नदी विकास खोरे' प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली, तर नदी जोड प्रकल्पही डॉ. आंबेडकरांचीच देण आहे, भारत देश नद्यांबाबत सुदैवी आहे.

परंतु पुरेशा नियोजनाअभावी देशातील नद्यांचे पुरेसे पाणी अडवले जात नाही, तर ते समुद्रात वाहून जाते, या नद्यांचे पाणी माणसांकडून कमालीचे प्रदूषित केले जाते, त्यातून जलचर आणि वनीकरण, तसेच निसर्ग संपदेलाही धोका पोहचतो, त्यामुळे बाबासाहेबांच्या जलधोरणाची गरज आजही तेवढीच महत्वाची आहे. एका ठिकाणी अतिवृष्टीमुळे हानी होते, दुर्सया भागात कोरडा दुष्काळ, जादा पाऊस असलेल्या ठिकाणाचे पाणी धरणातून अडवून ते कमी पर्जन्यमान असलेल्या ठिकाणी प्रवाहीत करण्याची संकल्पना आणि उद्देश डॉ. आंबेडकरांनी मांडली. नदीजोड प्रकल्पाचा पाया हीच संकल्पना आहे. अस्पृश्यतेमुळे पाण्याच्या मडक्यालाही स्पर्श करण्याचा अधिकार बाबासाहेबांना नव्हता, मात्र हेच पाणी शाश्वत ऊर्जा-विकासात रुपांतरित करून हे 'जीवन' इथल्या नागरिकांसाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी कायमचे खुले केले.

# बहुस्तरीय क्रांती आणि बीजारोपण



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनकार्यात क्रांती ही संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरली. त्यांनी केवळ सामाजिक क्रांती केली नाही, तर अनेक क्रांत्यांचे बीजारोपण केले. त्यांची क्रांतीची संकल्पना बहुस्तरीय होती. 'वर्चस्वाचा अंत' हे त्यांच्या क्रांती संकल्पनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सातत्याने वर्चस्वाच्या विरोधात लढा देत होते. वर्चस्वाचा अंत करून समतेवर आधारलेला समाज व समतेचा सार्वजनिक व्यवहार करणारी शासन व्यवस्था त्यांना प्रस्थापित करावयाची होती. यामुळे डॉ. आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, प्रतिष्ठा इत्यादी संकल्पना 'साध्य' या अर्थाने उपयोगात आणल्या होत्या. यामुळे डॉ. आंबेडकरांनी वापरलेल्या संकल्पनांचे अर्थ संदर्भासह आणि वर्चस्वाच्या विरोधात लढण्याच्या संदर्भात घ्यावे लागतात. डॉ. आंबेडकर 'क्रांती' ही संकल्पना वापरतात. परंतु त्यांच्या एकूण लेखनामध्ये 'क्रांती' या संकल्पनेचा अर्थ संदर्भानुसार बदलत जातो. उदाहरणार्थ, 'सामाजिक क्रांती', 'बौद्ध क्रांती', 'सम्राट अशोकाच्या पाठिंब्याने घडलेली क्रांती', 'क्रांती आणि प्रतिक्रांती' अशी कितीतरी उदाहरणे नोंदवता येतात. परंतु त्यांचा मुख्य उद्देश वर्चस्वाचा अंत करणे हा होता. या अथार्ला अनुसरून त्यांची क्रांतीची संकल्पना आजच्या काळात समजून घेतली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषितांसाठी 'सामाजिक क्रांती' केली, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यांनी केवळ सामाजिक क्रांती केली नाही. त्यांनी अनेक क्रांत्यांचे बीजारोपण केले. अनेक क्रांत्या करणारे असे ते अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या क्रांतिकायार्ची सुरुवात 'मूकनायक'पासून झाली. 'मूकनायक' ही संकल्पना क्रांतीचा आशय व्यक्त करणारी आहे. त्यांनी केवळ तत्काळ परिवर्तन साधले नाही, तर अनेक दूरगामी क्रांतिकारी परिवर्तने साधण्याचा विचार सातत्याने विकसित केला. प्रत्यक्ष आणि अदृश्य क्रांत्यांच्या प्रक्रियेलाही त्यांनी सुरुवात केली, ज्या आजही समाजात सुरू आहेत. त्यावर समाजात चर्चा होत असते. पारंपरिक समाजरचनेविरुद्ध त्यांनी जो लढा दिला तो केवळ सामाजिक स्तरावरचा नव्हता; तर बौद्धिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय स्तरावरही होता. त्यामुळे बौद्धिक क्रांती, आर्थिक क्रांती, धम्म क्रांती, घटनात्मक क्रांती, बंधुता क्रांती, आत्मसन्मानाची क्रांती इत्यादी संकल्पना सहजासहजी विकसित झालेल्या दिसतात. त्यांच्या क्रांतीच्या संकल्पनेला फुलाचे रूपक वापरले तर फुलाची प्रत्येक पाकळी म्हणजे एक स्वतंत्र क्रांती ठरते. ज्याप्रमाणे एकाच फुलाला अनेक पाकळ्या असतात, त्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीच्या संकल्पनेला अनेक उपक्रांतीच्या आयडिया असल्याचे दिसते. ऐतिहासिक क्रांत्यांचे त्यांनी वर्गीकरण केले. त्यांच्या वर्गीकरणानुसार 'क्रांती आणि प्रतिक्रांती' असा त्यांनी क्रांती संकल्पनेत सूक्ष्म फरक केला. डॉ. आंबेडकर क्रांतीची संकल्पना निश्चित अथार्ने वापरत होते. त्यांनी क्रांतीची संकल्पना ढोबळ अथार्ने कधीही वापरली नाही.

**बहुस्तरीय क्रांती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकाच जीवनात अनेक क्रांत्या केल्या. अनेक अदृश्य क्रांत्यांची प्रक्रिया सुरू केली. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य होते. समाज हा पारंपरिक असतो. समाजाची रचना, कार्यपद्धती आणि हितसंबंध सातत्याने रूढीवादी भूमिका घेतात. याउलट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजामध्ये क्रांती घडवून आणली. परंतु केवळ क्रांती केली एवढ्याने त्यांच्या जीवन कार्याचे वर्णन पूर्ण होत नाही. कारण त्यांनी केवळ एक क्रांती केली नाही, तर एकाच वेळी अनेक क्रांत्या केल्या. तसेच त्यांनी अनेक अदृश्य क्रांत्यांच्या प्रक्रिया घडविल्या (बंधुत्वाची क्रांती, प्रतिष्ठेची क्रांती). ती प्रक्रिया आजही सुरू आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी अनेक क्रांत्यांचे बीजारोपण केले. उदाहरणार्थ ओबीसी क्रांती व महिलांच्या राजकीय सहभागाच्या क्रांतीचे बीजारोपण केले. डॉ. आंबेडकरांनी अशा बहुस्तरीय क्रांत्यांचा सांधा एकत्रित जोडला. त्यांची क्रांतीची संकल्पना बहुस्तरीय होती. ही बहुस्तरीय क्रांतीची संकल्पना त्यांचे गुरू गौतम बुद्ध, महात्मा फुले यांच्या विचारात व कार्यात सुस्पष्टपणे दिसते. म. फुलेंनी उपेक्षित समाजासाठी शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तर बुद्धांनी करुणा, समता व विचारस्वातंत्र्य यांच्या माध्यमातून समाजप्रवाह बदलण्याचा प्रयत्न केला. या दोघांच्या विचारांची सांगड डॉ. आंबेडकरांनी घातली आणि त्या विचारांचा आधुनिक संदर्भात विकास केला. अशी काही उदाहरणे सुस्पष्टपणे सांगता येतात.

- डॉ. आंबेडकरांनी गौतम बुद्धांना आपले गुरू मानले. गौतम बुद्धांनी देखील एकाच वेळी अनेक प्रकारच्या क्रांत्या घडविल्या होत्या. अदृश्य क्रांत्यांची प्रक्रिया त्यांनी सुरू केली होती. तसेच पुढे सातत्याने काही क्रांत्यांची प्रक्रिया त्यांच्या विचारांना धरून सुरू राहिली. उदाहरणार्थ, डॉ. आंबेडकरांनी बुद्धाच्या विचारातून धम्म क्रांतीची संकल्पना विकसित केली. तसेच समाजातील वर्चस्वाच्या विरोधात लढा देण्यासाठी या संकल्पनेला जास्त टोकदार केले. बहुस्तरीय क्रांती, अदृश्य क्रांत्यांची प्रक्रिया आणि पुढील काळात क्रांतीची प्रक्रिया घडत राहणे हा एक प्रवाह डॉ. आंबेडकरांनी अधोरेखित केला.
- सम्राट अशोकाच्या पाठिंब्याने एक लहानशी क्रांती घडली होती, असाही विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला. परंतु 'प्रतिक्रांती' त्यानंतर घडली. सम्राट अशोकाचा पाठिंबा असतानाही क्रांती यशस्वी झाली नाही. हा इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा त्यांनी नोंदवला आहे.
- अशीच बहुस्तरीय क्रांतीची विचारसरणी महात्मा फुले यांची देखील होती. समाजातील उपेक्षित समूहांना प्रशासनाचा अंगभूत घटक होता यावे, यासाठीचा पाया फुले यांनी घातला. त्यांच्या विचारसरणीतही एकाच वेळी अनेक क्रांत्यांची सुरुवात झाली होती. म्हणूनच त्यांना डॉ. आंबेडकरांनीही आपला गुरू मानले. डॉ. आंबेडकरांनी गौतम बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा फुले यांच्या जीवन आणि कार्यातील क्रांतीच्या ऐतिहासिक संकल्पना समजून घेतल्या. आपल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात या संकल्पनांना डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाचे स्थान दिले. तसेच वर्चस्व विरोधी लढ्यामधले 'क्रांती' या संकल्पनेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

बाबासाहेबांच्या क्रांतीचा गाभा म्हणजे जातीय विषमतेचा अंत घडवून समतेचा पुरस्कार करणे, पितृसत्तेचा ऱ्हास घडवून लिंगभाव समता प्रस्थापित करणे. या अशा अनेक अदृश्य क्रांतींची प्रक्रिया जी बाह्य स्वरूपात दिसत नाही, पण समाजमनात खोलवर चालू असते, ती प्रक्रिया आंबेडकरांनी सुरू केली, जोपासली. पुढच्या पिढ्यांना यातूनच प्रेरणा मिळालेली आहे.

**प्रौढ मतदानाची क्रांती :** बाबासाहेबांनी सर्वसामान्यांना प्रौढ मतदानाचा अधिकार देऊन एक अदृश्य क्रांती भारतात घडवली आहे. हा मुद्दा विविध संदर्भांसह लक्षात घेतला तर या क्रांतीची तीव्रता समजते. दारिद्र्य, निरक्षरता, सामाजिक श्रेष्ठ-कनिष्ठता आणि हजारो वर्षांच्या विषमतावादी व शोषणात्मक परंपरा असलेल्या भारतीय समाजात त्यांनी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची प्रस्थापना केली. ही एक घटनात्मक क्रांती होती. एकाच वेळी सार्वत्रिक पातळीवर मतदानाचा अधिकार इतर देशांमध्ये दिला गेला नव्हता. भारतामध्ये मात्र ही प्रक्रिया डॉ. आंबेडकरांनी घडवली. वर्णवर्चस्ववादी समाजात फक्त काही लोकांकडेच सुज्ञपणे मतदान करण्याची राजकीय जाणीव आहे, असे मानले जात होते. ही श्रेष्ठत्वाची भ्रामक जाणीव होती. श्रेष्ठत्वाच्या या भ्रामक जाणिवेवर मात करून सर्वसामान्य भारतीय लोकही सुज्ञपणे मतदान करू शकतात, या जाणिवेचे बीजारोपण डॉ. आंबेडकरांनी केले. लोकशाही प्रक्रियेबद्दलच्या सर्व उच्चभ्रू समजुतींना नाकारले आणि एक अदृश्य क्रांती घडवून आणली. निवडणूक पद्धतीची लोकशाही ही तळागाळात व्यापक बदलाची प्रतिनिधी बनली, तर पंचायतींमध्ये महिला आणि उपेक्षित गटांसाठी राखीव जागा राखीव ठेवल्याने त्यांना स्वतःचे भविष्य घडविण्याची शक्ती मिळाली. प्रौढ भारतीयांना मतदार बनविणे हे भारताचे वसाहतवादमुक्तीचे मोठे पाऊल होते. कारण हा वसाहतवादी राजवटीचा वारसा नव्हता, तर भारतीयांनी स्वतः स्वतःसाठी सार्वत्रिक मताधिकाराची कल्पना स्वीकारली, या काल्पनिकतेवर कृती केली आणि ती राजकीय वास्तवात उतरवली. ही एक क्रांती का होती? कारण सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार हा वसाहतवादी पद्धतीपासून स्वतंत्र झाल्याचा एक महत्त्वाचा टप्पा होता. स्वातंत्र्यापूर्वीही ब्रिटिश वसाहतीच्या काळात निवडणूक संस्था अस्तित्वात होती. परंतु त्याकाळी निवडणुका या प्रामुख्याने सत्ताधारी वर्गाला सहकार्य करण्याचे आणि वसाहती राज्याला बळकटी देण्याचे साधन होत्या. या निवडणुकांमध्ये प्रतिनिधित्व स्वतंत्र मतदारांवर आधारित होते असले, तरी धार्मिक समुदाय आणि व्यावसायिक निकषावर आणि मर्यादित मताधिकारावर (सार्वत्रिक मताधिकार नव्हे) जागा वाटल्या जात होत्या. मतदारांना केवळ 'व्यक्ती' म्हणून परिभाषित करण्याऐवजी, कायद्याने त्यांना 'समुदाय' आणि 'गटांचे सदस्य' म्हणून परिभाषित केले होते. अशाप्रकारे ब्रिटिशांच्या वसाहतवादी राज्यव्यस्थेत निवडणुकांचा अनुभव आणि वारसा लोकांना लोकशाही पद्धतीचे प्रतिनिधित्व देत नव्हता. लोकशाही आणि प्रौढ मताधिकार या गोष्टी आधुनिक आहेत. लोकशाही आणि प्रौढ मताधिकार यांना गुणवत्तेचा निकष लावला गेला होता. हा निकष लोकमान्य टिळक यांनी लावला. मात्र डॉ. आंबेडकरांनी लोकशाही आणि प्रौढ मताधिकार यांना लावलेला गुणवत्तेचा निकष स्वातंत्र्यपूर्व काळामध्येच अमान्य केला. त्यांनी सामान्य व अशिक्षित व्यक्तींना देखील लोकशाहीत अधिकार दिले. तसेच प्रौढ मताधिकार दिला. याबरोबरच त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीत आणि प्रौढ मताधिकारामध्ये गुणवत्ता आली पाहिजे, असाही विचार मांडला. म्हणजेच सुरुवातीला प्रस्थापितांचे वर्चस्व दूर करण्यासाठी त्यांनी गुणवत्तेचा आग्रह नाकारला आणि लोकशाहीत सहभागाची संधी मिळाल्यानंतर प्रस्थापितांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी त्यांनी पुन्हा गुणवत्तेचा आग्रह धरला. म्हणजे थोडक्यात डॉ. आंबेडकरांना नियमापेक्षा तत्त्व महत्त्वाचे वाटत होते. कारण त्यांना वर्चस्वाचा ऱ्हास घडवून समता प्रस्थापित करणे महत्त्वाचे वाटत होते.

**आत्मसन्मान क्रांती :** डॉ. आंबेडकरांसाठी आत्मसन्मानाची क्रांती सुद्धा महत्त्वाची होती. व्यक्तीच्या आत्मसन्मानाची क्रांती म्हणजेच लोकशाही क्रांती होय, असाही एक अर्थ इथे घेता येईल. या संदभार्तील दोन तपशील महत्त्वाचे आहेत. डॉ. आंबेडकरांनी बंधुता हे तत्त्व मांडत असतानाच आत्मसन्मानाची क्रांती घडली पाहिजे, हा विचार भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये मांडला होता. प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मान मिळाला पाहिजे. वंश, जात, धर्म, भाषा, स्त्री-पुरुष इत्यादी घटकांच्या आधारे व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा अंत घडू नये, असे विचार त्यांनी वेगवेगळ्या भाषणांमध्ये आणि लेखनामध्ये व्यक्त केले होते. प्रत्येक व्यक्तीला 'नागरिक' म्हणून मान्यता देऊन त्याबरोबरच त्या व्यक्तीला आत्मसन्मान देण्याची व्यवस्था डॉ आंबेडकरांनी निर्माण केली. तसेच त्यांनी आत्मसन्मान नाकारणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात संघर्षही केला. डॉ. आंबेडकरांनी प्रौढ मताधिकार, आत्मसन्मान या संकल्पनांचा अर्थ 'क्रांती' या अर्थाने घेतला होता. परंतु त्यांचा क्रांतीचा विचार हा 'फ्रेंच राज्यक्रांती' किंवा 'रक्तरंजित राज्यक्रांती' असा नव्हता. फ्रेंच राज्यक्रांतीत त्यांना पितृसत्ताक व्यवस्था दिसत होती. त्यामुळे त्यांनी बुद्धाच्या विचारातील क्रांतीचा विचार स्वीकारला. हिंसक क्रांती वर्चस्वाचा अंत करत नाही. त्यामुळे हिंसक क्रांतीच्या तुलनेत त्यांनी 'धम्मक्रांती'चा पुरस्कार केला. धम्मक्रांतीमध्येही नैतिकतेची क्रांती त्यांना अपेक्षित होती. थोडक्यात 'वर्चस्वाचा अंत' हे त्यांच्या क्रांती संकल्पनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. हे वैशिष्ट्य त्यांना गौतम बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा फुले यांच्या क्रांतीच्या संकल्पनांमध्ये दिसत होते.



# ज्ञानयोगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेऊन देशासाठी व समाजासाठी अहोरात्र कार्य करुन सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली आहे. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरलेला आहे. अशा या थोर महापुरुषात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात वर आहे.*

*भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमाचे वडील रामजी आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून दक्ष असत, त्यांना स्वतः वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. मुलांना ही ते चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्याच्या ठायी आढळते. तुकाराम व कबीर बाबासाहेबांच्या अभ्यासाचे विषय भावी आयुष्यात झालेले दिसतात.*

*डॉ. बाबासाहेब म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून समाजक्रांतीचे स्फुलींग चेतवून डॉ. आंबेडकर यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले.*

**डॉ. आंबेडकर म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मनुष्य मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले आणि रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्री वर्गाच्या शेतकरी, मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखविते आणि मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीय नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

**शैक्षणिक विचार:**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी या साठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करुनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिक दृष्टा सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन १९४६ साली करुन त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानीत.

**सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीति, अत्याचार, अन्यायास त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय समाज एकसंघ होणार नाही असे ते समजत. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करुन त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क ही आपल्याला कळत नाही अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग समाजात फुंकले.

**प्रखर राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा :**

डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तात्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली त्यांना वाटले डॉ. आंबेडकर आता देश सोडून जाणार परंतु डॉ. आंबेडकरांनी सांगितले, ''आम्ही या भारतदेशाची संतान आहोत, आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच, राष्ट्रावर संकट आल्यास प्राणपणाला लावून देशाचे रक्षण केले व करु सुद्धा'' यात डॉ. आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा समावलेली आहे.

**स्त्रियाचे शेतकरी, शेतमजूर श्रम जीवी, व दलितांचे कैवारी :**

स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरी डॉ. आंबेडकरांनी दूर केली. १९२७ ते १९५६ पर्यंतच्या काळात बाबासाहेबांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा, वाढावा म्हणून सतत प्रयत्न केला. १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा, सर्व द्रुगुणांपासून दुर रहा, मुलामुलींना शिक्षण द्या त्यांना महत्वाकांक्षी बनवा, त्यांचा न्यूनगंड दूर करा असा महत्वाचा उपदेश केला. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजिवीच्या साठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे म्हणून ते सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे तर शेतकरी व मजूर यांच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महान देणगी होय.

अशा या महामानवाने ६ डिसेंबर १९५६ साली अखेरचा श्वास घेतला आणि आपल्या कार्याचा ठसा मागे उमटवला.











# ठाण्यात 14 एप्रिल रोजी वाहतुकीत मोठे बदल

## किती मिरवणुका निघणार?



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने ठाण्यात मंगळवारी (14 एप्रिल) तब्बल 64 मिरवणुका काढण्यात येणार आहेत. तसेच अनेक भागांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे वाहतूक पोलिसांनी वाहतुकीच्या मार्गात मोठे बदल केले आहेत. हे बदल मंगळवारी (14 एप्रिल) सकाळी 9 वाजल्यापासून रात्री 12 वाजेपर्यंत लागू असतील. तसेच मिरवणुकीच्या मार्गावर वाहने उभी करण्यास मनाई असल्याचे ठाणे शहर वाहतूक शाखेचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी सांगितले आहे. मात्र, वाहतुकीतील हे बदल अग्निशमन दलाची वाहने, पोलीस वाहने, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

- **या भागात मिरवणुका :** कोर्ट नाका, ठाणे रेल्वे स्टेशन परिसह, खोपट, कोपरी आनंदनगर, धामणकर नाका, डोंबिवली पूर्व-पश्चिम, कल्याण फाटा, उल्हासनगर गोल मैदान, सुभाष टेकडी भागात मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या मिरवणुकांदरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये तसेच वाहनचालकांची गैरसोय टाळण्यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी वाहतुकीत एक दिवसासाठी मोठे बदल केले आहेत. ठाण्यातील खोपटमधून सकाळी संविधान रॅली तर कोर्ट नाका आणि ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. आंबेडकरांच्या स्मारकाजवळ आणि कोपरी भागात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ठाणे स्टेशन परिसर, खोपट, कोर्ट नाका, भिवंडी, डोंबिवली, कल्याण भागातून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. तेथील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत बदल केले आहेत. मात्र, वाहतुकीतील बदलाची अधिसूचना अग्निशमन दलाची वाहने, पोलीस वाहने, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही. असे वाहतूक विभागाने स्पष्ट केले आहे.
- **ठाण्यातील प्रवेशबंदी आणि बदललेले मार्ग :** जीपीओ येथून कोर्टनाका मार्गे ठाणे स्टेशनच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना जीपीओ येथे प्रवेश बंद आहे. येथील वाहने सेंट्रल मैदान, ठाणे मध्यवर्ती कारागृह मार्गे, दादोजी कोंडदेव स्टेडियम, अग्निशमन दल, बाजारपेठ ए वन फर्निचर मार्गे जातील. कळवा खाडी पूल येथून येणाऱ्या वाहनांना उर्जिता उपाहारगृहाजवळ प्रवेश बंद असेल. ही वाहने ठाणे मध्यवर्ती कारागृह मार्गे, जीपीओ मार्गे मार्गक्रमण करतील. सॅटीस पुलावरून टीएमटी बस, रेल्वे स्टेशनजवळील एसटी बस यांना टॉवर नाका, टेंभीनाका मार्गे प्रवेश बंद असेल. या गाड्या गोखले रोड, नौपाडा, हरिनिवास मार्गे वाहतूक करतील. टॉवर नाका आणि टेंभी नाका येथून वाहतूक करणाऱ्या रिक्षा आणि चार चाकी वाहनांना मुस चौक येथे प्रवेशबंदी असेल. ही वाहने मुस चौकातून डावीकडे वळण घेऊन मार्गक्रमण करतील. कॅडबरी आणि नौपाड्याकडून डॉ. आंबेडकर रोडकडे जाणाऱ्या वाहनांना खोपट येथे प्रवेश बंद असेल. ही वाहने खोपटकडून डावीकडे वळण घेऊन कोलबाड, मिनाताई ठाकरे चौकमार्गे मार्गक्रमण करतील. डॉ. आंबेडकर रोडवरून खोपटच्या दिशेने प्रवेश बंद असून ही वाहने उथळसर नाका मार्गे पुढे जातील.
- **डोंबिवलीतील स्थिती :** डोंबिवली पूर्व-पश्चिम भागात 10 ठिकाणी प्रवेशबंदी असेल. यात पूर्वेकडील छत्रपती शिवाजी महाराज सर्कल, पाटणकर चौक चार रस्ता, पश्चिमेकडील कोपर ब्रिज,मोठा गाव रेतीबंदर चौक, म्हसोबा चौक तसेच ठाकुर्ली टी पॉईंट हनुमान मंदिर येथे वाहनांना प्रवेश बंद केला आहे. त्यामुळे वाहनांनी पयार्यी मागार्चा अवलंब करायचा आहे.
- **भिवंडीतील मार्ग :** भिवंडीतील धामणकर नाका येथून तसेच, रांजनोली चौकातून भिवंडीतील स्व.आनंद दिघे चौक आणि केशरबाग नाका येथे सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. ही वाहने वंजारपट्टी मार्गे इच्छितस्थळी जातील.
- **उल्हासनगरमधील प्रवेशबंदी :** उल्हासनगर गोल मैदान झ्र नेहरू चौक झ्र न्यु इरा चौक झ्र शिवाजी चौक ते डॉ. आंबेडकर चौक या मार्गावर नो पार्किंग आणि सर्व वाहनांना प्रवेशबंदी आहे. ही वाहने पयार्यी मागार्ने पुढे जातील. सुभाष टेकडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते लाल चक्की चौक या मार्गावर मिरवणूक संपेपर्यंत प्रवेश बंद करण्यात आला आहे.
- **कल्याणमधील वाहतूक :** कल्याण पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र चौक आणि मुंब्रा वाहतूक उपविभागातील कल्याण फाटा येथे वाहनांना प्रवेश बंदी आहे. ही वाहने मुंब्रा बायपास-खारेगाव-मुंबई नाशिक महामागार्ने पुढे जातील. शहाड जकात नाकामार्गे कल्याण रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांना प्रेम ऑटो सर्कल चौकात प्रवेश नाही. बदलापूर अंबरनाथ रोड नेवाळी नाका येथून तसेच नवी मुंबईकडून तळोजा बायपासमार्गे खोणी निसर्ग धाब्याकडे येणाऱ्या सर्व अवजड वाहनांना प्रवेशबंदी आहे. ही वाहने दिलेल्या पयार्यी मागार्ने इच्छित स्थळी जातील.

# स्वरसम्राज्ञी आशाताई भोसले अनंतात विलीन



■मुंबई। प्रतिनिधी,

ज्येष्ठ गायिका स्वरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन झाल्या आहेत. मुंबईतील शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार आशिष शेलार, मनसेचे प्रमुख राज ठाकरे, मंत्री छगन भुजबळ, मंत्री संजय शिरसाट, मुंबईच्या महापौर रितू तावडे, तसेच राजकीय, सामाजिक, सिनेजगतातील दिग्गज व्यक्ती उपस्थित होत्या. आशा भोसले आज आपल्यात नसल्या तरी त्यांनी गायलेल्या हजारो गाण्यांच्या रुपात त्या कायम आपल्यातच राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### शाककीय इतमामात अंत्यसंस्कार

आशा भोसले यांचे 12 एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. हे वृत्त समोर येताच सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. आज शिवाजी पार्कमधील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याआधी लोअर परळ येथील निवासस्थानी आशाताईंचे पार्थित अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. त्यानंतर अंत्ययात्रेदरम्यान हजारो लोकांनी आशाताईंचे अखेरचे दर्शन घेतले. शिवाजी पार्कमधील स्मशानभूमीत मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतर राजकीय नेत्यांनी आशाताईंना पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### गेल्या वर्षी अनेक जाहीर कार्यक्रमांना उपस्थिती

त्यांना अलौकिक स्वरांची देणगी लाभली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत 12 हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली अशा वेगवेगळ्या भाषांत त्यांनी गाणी गायली. आशाताई गेल्या वर्षीच अनेक जाहीर कार्यक्रमांना उपस्थित होत्या. वयाची नव्वदी पार करूनही खणखणीत आणि मधूर आवाजाने त्यांनी अनेक कार्यक्रमांत गाणी गायली. परंतु गेल्या काही दिवसांपासून त्या सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर होत्या. शनिवारी संध्याकाळी 7 वाजता त्यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यानंतर त्यांना तातडीने ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु उपचाराला साथ न दिल्याने आशाताईंचे निधन झाले.

### मुंबईत होणार 'आशा भोसले संगीत अकॅडमी'

ज्येष्ठ पार्श्वगायिका पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर, त्यांनी व्यक्त केलेली एक मोठी इच्छा पूर्ण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुंबईत राज्य सरकारच्या वतीने ह्यआशा भोसले संगीत अकॅडमीह्न स्थापन करण्यात येणार असून, मंत्रिमंडळाच्या सोमवारी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर मोहोर उमटवण्यात आली. वांद्रे ते अंधेरी दरम्यान या अकॅडमीसाठी हक्काची जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत. आशा भोसले यांनी आपल्या हयातीत राज्य सरकारकडे मुंबईत एका जागतिक दर्जाच्या संगीत अकॅडमीसाठी मागणी केली होती. वांद्रे आणि अंधेरी दरम्यानच्या परिसरात यासाठी जागा मिळावी, अशी त्यांची आग्रही विनंती होती. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी आशाताईंच्या स्मारकाचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर भाष्य करताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, केवळ पारंपरिक स्मारक उभारण्यापेक्षा आशाताईंनी स्वतः दिलेला संगीत अकॅडमीचा प्रस्ताव पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. या निर्णयानुसार, संगीत क्षेत्रातील नवोदित कलाकारांना प्रशिक्षण देण्यासाठी ही अकॅडमी मैलाचा दगड ठरणार आहे. या प्रकल्पासाठी योग्य जागेचा शोध घेण्याची जबाबदारी म्हाडाकडे सोपवण्यात आली आहे. वांद्रे ते अंधेरी या पट्ट्यात शासकीय भूखंड उपलब्ध करून देऊन तिथे अत्याधुनिक सुविधांनी सज्ज अशी ही वास्तू उभारली जाईल.

# नागपुरात 2 शॅम्पूच्या बाटलीत निघाले 50 कॅप्सूल, अंमली पदार्थांची किंमत तब्बल 4 कोटी 26 लाख

## डीआरआयची मोठी कारवाई

■नागपूर। प्रतिनिधी,

अंमली पदार्थांची तस्करी करणारे आरोपी काय-काय शक्कल लढवून तस्करी करतील याचा कधीच अंदाज बांधता येणार नाही. तस्करांच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या पाहून तपास अधिकारी देखील चक्रावून जातात. पण तरीही अधिकारी या तस्करांचा शोध घेण्यात यशस्वी होतात. आतादेखील अशीच कारवाई समोर आली आहे. अंमली पदार्थ तस्करीसाठी गुन्हेगार कोणतेही कुटील मार्ग अवलंबू शकतात, याचा धक्कादायक नमुना नागपुरात समोर आला आहे. शॅम्पूच्या साध्या बाटल्यांमध्ये कोकेन लपवून राजधानी एक्सप्रेसमधून तस्करी केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) नागपूर युनिटने केलेल्या धडक कारवाईत तब्बल 4 कोटी 26 लाख रुपये किमतीचे 853 ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले असून एका महिलेला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी हजरत निजामुद्दीन केएसआर बेंगळुरू राजधानी एक्सप्रेसवर लक्ष ठेवले होते. संबंधित महिला दिल्लीहून बेंगळुरूकडे



प्रवास करत असल्याची माहिती मिळताच अधिकाऱ्यांनी नागपूर स्थानकावर सापळा रचला. गाडी स्थानकात आल्यानंतर संशयित महिलेवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. पुढे अजनी स्थानकावर गाडी थांबताच तिला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.

तपासादरम्यान सुरुवातीला तिच्याकडे कोणतेही संशयास्पद साहित्य आढळले नाही. तिच्या सामानात कपडे, सौंदर्य प्रसाधने आणि सामान्य प्रवासी साहित्य होते. मात्र कपड्यांमध्ये ठेवलेल्या दोन शॅम्पूच्या बाटल्या अधिकाऱ्यांना संशयास्पद वाटल्या. त्यामुळे त्या बाटल्यांमधील द्रव काढल्यानंतर अधिकाऱ्यांना मोठा धक्का बसला.

बाटल्यांमध्ये पिवळ्या रंगाच्या ५० सीलबंद कॅप्सूल्स आढळल्या. या कॅप्सूल्समध्ये पांढऱ्या रंगाचे पावडर स्वरूपातील कोकेन अत्यंत कौशल्याने लपवून ठेवण्यात आले होते. फील्ड ड्रग टेस्ट किटद्वारे तपासणी केल्यानंतर तो पदार्थ कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत एकूण ८५३ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले. आंतरराष्ट्रीय काळ्या बाजारात त्याची किंमत सुमारे ४ कोटी २६ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणी संबंधित महिलेला एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीनंतर तिला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तिला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

दरम्यान, या तस्करीमागे मोठे आंतरराज्य रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अटक करण्यात आलेल्या महिलेच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. पुढील तपासात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. डीआरआयच्या या कारवाईमुळे अमलीपदार्थ तस्करांना मोठा धक्का बसला आहे.

# पुण्यात पीएचडी चे शिक्षण घेणाऱ्या 30 वर्षीय तरुणीनं संपवलं जीवन

## सुसाईड नोटमध्ये छेडछाडीचा आरोप अन् भयंकर...

■पुणे। प्रतिनिधी,

शहरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका 30 वर्षीय पीएचडीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणीने आपलं जीवन संपवलं आहे. संबंधित प्रकरण चिंचवड परिसरातील असून या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. अशातच या घटनेला एक वेगळं वळण प्राप्त झालं आहे. या प्रकरणातून माहिती समोर आली की, विद्याथीर्नीचं काही काळावधीपासून मानसिक संतुलन बिघडलं होतं.

या प्रकरणात पोलिसांनी कारवाई करत वरिष्ठ अधिकाऱ्याला अटक केली. हे प्रकरण केवळ आत्महत्येशी संबंधित नसून मानसिक छळाशी जोडण्यात आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपीची ओळख कोरेगाव पार्कमधील भारतीय वनस्पती कार्यालयाचे प्रमुख डॉ. ए. बेंजामिन अशी पटली होती.

### पीएचडीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणीच्या आत्महत्या प्रकरणात आरोपी अटकेत

डॉ. बेंजामिन हे मृत विद्यार्थिनीचे संशोधन मार्गदर्शक होते. मागील दोन वर्षांपासून तरुणी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली पीएचडीचे शिक्षण घेत होती. पीडित विद्यार्थिनीने पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली. नंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत अटक केली. तपासादरम्यान पीडित विद्यार्थिनीची एक सुसाईड नोट समोर आली, ती सुसाइड नोट महत्त्वाचा पुरावा ठरली आहे.

### विनयभंगाशी संबंधित आरोपीवर गुन्हा

पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे आणि महिलेवर हल्ला व विनयभंगाशी संबंधित गुन्हा दाखल केला. तपास अधिकाऱ्यांचे म्हणणे असे की, सर्व आरोपांचे गांभीर्य ओळखून चौकशी केली जात असून पुराव्याच्या आधारे पुढील कारवाई केली. प्रकारणाचे गांभीर्य लक्षात घेत, पोलीस बारकाईने तपास करत आहेत.

पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ यांनी माहिती दिली की, आरोपीने न्यायालयात हजर करण्यात आले. 15 एप्रिलपर्यंत त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. चौकशीदरम्यान आरोपीने अनेक प्रश्न उपस्थित केलेत. विद्यार्थिनीवर कोणता दबाव आणला गेला होता, याबाबतची माहिती पोलीस जाणून घेत आहेत. आरोपीविरुद्ध संभाव्य तक्रारींचा तपास केला जातोय.

या प्रकरणाने शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मानसिक आरोग्याबाबत पुन्हा एकदा गंभीर चिंता निर्माण झाली. विशेषतः संशोधन मार्गदर्शक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंधांमध्ये पारदर्शक आणि उत्तरदायित्वाची गरज यातूनच अधोरेखित होते. सध्या या



# कौटुंबिक वादातून मुलानेच स्वतःच्या वडिलांना संपवलं

■गडचिरोली। प्रतिनिधी,

गडचिरोली जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. गडचिरोलीच्या आरमोरी तालुक्यातील पालोरा गावात कौटुंबिक वादातून मुलाने थेट वडीलांनांचं संपवल्याची घटना समोर आली आहे. स्वतःच्या वडिलांवर कुऱ्हाडीने वार करून मुलाने निर्घृण हत्या केली आहे. देवाजी धकाते (65) असे मृतक वडिलांचे नाव असून योगेश धकाते (25) आरोपी मुलाचे



नाव आहे.

वडील रात्री वीटभट्टीवरून घरी परतत असताना लपून बसलेल्या योगेशने त्यांच्यावर कुऱ्हाडीने सपासप वार केले. फोनवर बोलत असलेल्या मुलीने वडिलांचा शेवटचा आक्रोश ऐकला. कौटुंबिक वाद, पत्नीसोबतचे मतभेद आणि राग यामुळे योगेशने हा टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून समोर आली आहे. हत्या केल्यानंतर आरोपीने घरात जाऊन कुऱ्हाड लपवली आणि वडिलांना शोधण्याचे नाटकही केलं. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने खुनाची कबुली दिली. पोलीसांनी आरोपी योगेश धकाते याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

# सोशल मीडियावर राजू शेख झाला अजय म्हस्के, तरूणीची फसवणूक

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर जिल्ह्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून एका महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची आर्थिक व मानसिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. बनावट ओळख वापरून विश्वास संपादन करत लाखो रुपये उकळल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील राजू सिकंदर शेख या व्यक्तीने अजय म्हस्के या नावाने बनावट सोशल मीडिया अकाउंट तयार केले होते. त्याद्वारे त्याने 29 वर्षीय महिलेशी संपर्क साधत हळूहळू जवळीक निर्माण केली. लग्नाचे आमिष दाखवत आरोपीने तिचा विश्वास जिंकला. यानंतर संबंधित महिलेला मंदिरात नेऊन खोटे लग्न केल्याचा बनाव करण्यात आला. पुढील सहा महिन्यांत आरोपीने तिच्याकडून सुमारे अडीच लाख रुपये उकळल्याचे समोर आले आहे. तसेच, आरोपीच्या पत्नीने अश्लिल फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आणखी दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. घडलेल्या प्रकारामुळे घाबरलेल्या पीडितेने केळवे सागरी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी तत्काळ हालचाली करत सापळा रचला आणि आरोपीला पुणे येथून अटक केली. न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून त्याच्याविरोधात फसवणूक, खंडणी आणि ब्लॅकमेलिंगचे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, पीडित महिलेने इतर तरुणी व महिलांना सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींवर सहज विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. कोणतेही आर्थिक व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, असेही तिने नमूद केले आहे

# सीसीटीव्हीतून मोलकरणीचे कृत्य पाहून घरामालकाला धक्काच बसला

■मुंबई। प्रतिनिधी,

प्रभादेवी येथील एका व्यावसायिकाच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीची चोरी उघड झाली आहे. व्यावसायिकाच्या घरातील रक्कम काही दिवसांपासून गायब होत होती. याचा व्यावसायिकाने छडा लावण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने घरात सीसीटीव्ही बसवले. पण, सीसीटीव्हीत पाहिलेल्या घटनेनंतर त्यांना हादराच बसला.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभादेवी येथील सिद्धिविनायक होरायझन टॉवरमध्ये ६२ वर्षीय व्यावसायिक राजेंद्र देवकीनंदन धानुका आपल्या पत्नी ज्योती धानुका यांच्यासोबत राहतात. क्रॉफर्ड मार्केट येथे धानुका यांचा व्यवसाय आहे. पती-पत्नी दोघेही सकाळी कामावरून निघून जातात. घर मोठे असल्याने त्यांनी सुचिता पाटील नावाच्या महिलेला अडीच वर्षांपूर्वी कामासाठी ठेवले होते. सुचिता पाटील ही सकाळी ९ ते १०.३० दरम्यान काम करायची.

अलीकडेच धानुका यांनी आर्थिक वर्षाच्या कामासाठी सुमारे ६ लाख रुपए आणून बेडरूमधील कपाटात ठेवले होते. त्याशिवाय मुलीच्या लग्नानंतर उरलेले ३ ते ५ लाखांची रक्कम कपाटात ठेवले होते. मागील आठवड्यात जेव्हा धानुका यांनी रोख रक्कम मोजली त्यात २ लाख रुपए कमी आढळून आले होते.

सुरूवातीला कुणावर संशय गेला नाही. मात्र, सतत पैसे कमी होत असल्याने धानुका दाम्पत्याला शंका आली. त्यामुळे त्यांनी ४ एप्रिलला बेडरूमध्ये गुप्तपणे सीसीटीव्ही कॅमेरा लावला, ज्याची माहिती मोलकरीण सुचिता पाटीलला नव्हती. ६ एप्रिलला धानुका दाम्पत्य कामासाठी निघून गेले.

त्यानंतर धानुका यांनी मोबाईवर सीसीटीव्ही लाईव्ह फुटेज पाहिले, त्यात १०.२० च्या दरम्यान सुचिता पाटील ही बेडरूमध्ये शिरली. तिने सगळे पडदे बंद केले. चावी शोधून कपाट उघडले आणि त्यातील ५०० रूपयांच्या नोटांच्या बंडलमधून पैसे काढत आपल्या अंतरवस्त्रात लपवले.

हे पाहून धानुका दाम्पत्याला एकच धक्का बसला. त्यांनी तातडीने ५ एप्रिलचे फुटेजही तपासले. त्यात १०.५८ मिनिटाला सुचिता पाटील अशाच पद्धतीने पडदे बंद करून कपाटातून रक्कम चोरताना दिसली.

खात्री करण्यासाठी धानुका दाम्पत्य तातडीने घरी पोहोचले आणि दोन्ही कपाटातील रोख रक्कम पुन्हा मोजली. त्यानुसार ५ आणि ६ एप्रिलला मोलकरणीने एकूण २.७० लाख रुपए रक्कम चोरल्याचं स्पष्ट झाले. तसेच, गेल्या आठवड्यात गायब झालेले २ लाख मिळून एकूण ४.७० लाख रूपयांची चोरी झाली होती.

यानंतर धानुका दाम्पत्याने आपली मुलगी आणि जावयाला बोलावून घेत संपूर्ण घटनेची माहिती दिली. यानंतर दादर पोलीस ठाण्यात मोलकरीण सुचिता पाटील हीच्याविरुद्ध तक्रार दाखल केली.

तक्रारीत सांगितलं, ३० मार्च ते ६ एप्रिल दरम्यान वेगवेगळ्या वेळी बेडरूमच्या कपाटातून ५०० रूपयांच्या एकूण ९४० नोटा म्हणजे ४.७० लाख रूपयांच्या रोख रकमेची चोरी झाली आहे. प्राथमिक तपासात स्पष्ट झाले की, सुचिता पाटील ही पहिल्यांदा पडदे बंद करायची. जेणेकरून कुणाला संशय येणार नाही आणि नंतर कपाटातून पैसे चोरायची.

# व्हि.आय.पी स्टॉकचा व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप, एक मेसेज अन् काही सेकंदातच... पुण्यात बिझनसेमॅनसोबत भयानक घडलं

■मुंबई। प्रतिनिधी,

गेल्या काही दिवसांपासून राज्यात फसवणुकीच्या घटना सातत्याने वाढत आहेत. त्यातच आता शेअर बाजारात गुंतवणुकीच्या नावाखाली पुण्यात एक धक्कादायक फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. अवघ्या ११ दिवसात ५४ कोटी रुपये मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका ७५ वर्षीय निवृत्त व्यावसायिकाला गंडा घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या सायबर चोरट्याने या वृद्धाला तब्बल १२ कोटी ३१ लाख रुपयांना गंडा घातला आहे. या प्रकरणी पुणे सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस याचा अधिक तपास करत आहेत.

### नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक पुण्यातील हडपसर भागात राहतात. जानेवारी महिन्यात त्यांना एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सअ‍ॅप मेसेज आला होता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास प्रचंड नफा मिळेल, असे आमिष त्यांना दाखवण्यात आले. त्यानंतर त्यांना व्हि आय पी स्टॉक २४ नावाच्या एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये सामील करण्यात आले.

या ग्रुपमधील चोरट्यांनी त्यांना शेअर बाजारातील विविध योजनांची



माहिती देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. यावेळी चोरट्यांनी असा दावा केला की, आम्ही ज्याप्रमाणे सांगू त्याप्रमाणे जर तुम्ही गुंतवणूक केली, तर अवघ्या ११ दिवसात तुम्हाला ५४ कोटी रुपयांचा परतावा मिळेल. इतक्या कमी दिवसात इतका जास्त नफा मिळणार, या परताव्याच्या आमिषाला बळी पडून ज्येष्ठ नागरिकाने गुंतवणुकीस सुरुवात केली.

### ३ महिन्यात १२ कोटी लुबाडले

सायबर चोरट्यांच्या सांगण्यावरून त्या व्यावसायिकाने गेल्या तीन महिन्यांत वेगवेगळ्या ८ बँक खात्यांवर वेळोवेळी पैसे ट्रान्स्फर केले. गुंतवणूक केल्याचे भासवून चोरट्यांनी त्यांच्याकडून एकूण १२ कोटी ३१ लाख रुपये उकळले. मात्र, जेव्हा परतावा मिळण्याची वेळ आली, तेव्हा चोरट्यांनी टाळाटाळ सुरु केली. यानंतर मग आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

सध्या पुणे सायबर पोलीस या प्रकरणाचा तांत्रिक तपास करत आहे. तसेच ज्या बँक खात्यांवर पैसे वर्ग झाले आहेत, त्यांची माहिती काढली जात आहे. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी एक महत्त्वाची सूचना दिली आहे. अनोळखी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप, जादा परताव्याचे आमिष दाखवणारे मेसेज किंवा अनधिकृत ट्रेडिंग ॲप्सपासून नागरिकांनी सावध राहावे. कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी अधिकृत संस्थांची खातरजमा करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. तर दुसरीकडे पुणे शहरात ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करण्याचे सायबर चोरट्यांचे सत्र सुरूच असल्याने खळबळ उडाली आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com